0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.११/११/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७९/२०११/जा.९०९, दि. ११/११/२०११ व १९/११/२०११.
३) मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. यांचे दि. ११/११/२०११ रोजीचे निवेदन.
४) या कार्यालयाचे दिनांक १४/११/२०११ रोजीचे आदेश.
५) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ ठाणे यांचा दिनांक १८/११/२०११ रोजीचा तपासणी अहवाल.
६) या कार्यालयाचे दिनांक १८/११/२०११ रोजीचे आदेश.
७) सरपंच, ग्रामपंचायत दिवे (अंजूर), ता. भिवंडी, जि. ठाणे यांचे दि.२१/११/२०११ रोजीचे पत्र.
८) मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. यांचे दि. २२/११/२०११ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७९/२०११/जा.१०९५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १४/१२/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

## प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ९/११/२०११ रोजी मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि., आर्कोन वेअर हाऊस अॅन्ड लॉजीस्टीक पार्क, ४७६, गाळा क्र. अे १ ते ४, टिवे गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांचे पथक व पंचांसमवेत भेट दिली असता, सदर गोडाऊनच्या समोरील बाजुस एकुण ८ लोखंडी शटर असल्याचे दिसुन आले. त्यापैकी मुख्य दरवाज्यातुन प्रवेश केला असता तेथे उपस्थित सुरक्षा रक्षकास भेटीचे प्रयोजन सांगुन पथकाने स्वत:ची ओळख करुन देवून सुरक्षा रक्षकास त्याचे नांव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव सचिन श्रीकांत पवार असे सांगुन ते सदर कंपनीत सुरक्षा व्यवस्थापक म्हणून माहे जुन २०११ पासुन काम करीत असल्याचे सांगुन त्यांच्या अधिपत्याखाली एकुण १२ सुरक्षा रक्षक कार्यरत असुन त्या सर्वांवर सदर कंपनीचे

पर्यवेक्षण तसेच कंपनीत साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंची व इतर मालाची सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळण्याचे काम करीत असल्याचे सांगितले. तदनंतर फिरत्या पथकातील अधिकाऱ्यांनी सदर कंपनीत साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंची तपासणी करण्याचे सांगुन सदरच्या गेट क्र १ वरील नोंदवहीत नोंद करुन कंपनीत प्रवेश केला व उपस्थित सुरक्षा व्यवस्थापकास सदर कंपनीत कार्यरत असलेल्या जवाबदार अधिकाऱ्याचे नांव विचारले असता त्यांनी कंपनीचे व्यवस्थापक म्हणून श्री राजीव शर्मा हे काम करीत असल्याचे सांगुन त्यांची भेट घेण्याच्या सुचना दिल्या.

कंपनीत प्रवेश करुन निरीक्षण केले असता सदर कंपनीचे ८ लोखंडी शटर समोरील बाजुस व ८ लोखंडी शटर मागिल बाजुस असल्याचे दिसुन आले. सदर कंपनीचे व्यवस्थापक श्री राजीव शर्मा यांना पथकाने स्वत:ची ओळख करुन देवून भेटीचे प्रयोजन सांगुन त्यांच्या समवेत कंपनीत साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंची तपासणी केली असता मोठया व उंच लोखंडी रॅकवर जीवनावश्यक वस्तु म्हणजेच तांदुळ, विविध प्रकारचे कड़धान्य, खादयतेल, साखर व इतर गृहउपयोगी वस्तुंची मोठया प्रमाणावर साठवणूक केल्याचे दिसुन आले. कंपनीचे व्यवस्थापकास साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंच्या खरेदी, विक्री व साठवणूकीसाठी आवश्यक असलेल्या परवान्याबाबत विचारणा केली असता, ते गेल्या दिड महिन्यापासुन व्यवस्थापकपदी काम करीत असल्याचे सांगुन याबाबत त्यांना अधिक माहिती नसल्याचे सांगुन त्यांनी त्यांचे सहकारी श्री राजेश राय यांना शिधावाटप विभागाच्या परवान्याबाबत विचारले असता त्यांनी त्याच्या कंपनीच्या बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील कार्यालयात विचारणा करुन सांगतो असे सांगितले.

दरम्यानच्या काळात कंपनीमध्ये साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंचे तपशिल सादर करण्यास सांगितले असता त्यांचेकडे याबाबतच्या नोंदवहया नसल्याचे सांगुन सदरची सर्व माहिती संगणकात असुन सद्यस्थितीत संगणकाचे सर्वर डाऊन असल्याने, माहिती सादर करण्यास उशिर होईल असे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्यांचे समवेत असलेल्या पथकास जीवनावश्यक वस्तुंच्या मोजदाद करण्याबाबत सुचना देवून उपस्थित व्यवस्थापकास कंपनीचे संबंधित कर्मचाऱ्यांना मदतनीस म्हणुन सोबत पाठविण्याच्या सुचना दिल्या असता त्यांनी पथकाच्या मदतीस त्यांच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन साठा मोजदाद करण्यास पथकाने सुरवात केली. कंपनीमध्ये साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंची खरेदी बिलांबाबत विचारणा केली असता त्यांनी ट्रान्सपोर्टरच्या बिल्टी व इन्वॉईस सादर करुन त्यांच्या कंपनीत फक्त साठवणूकीचे काम होत असुन सदर साठयाची खरेदी व विक्री बाबतच्या सर्व सुचना त्यांच्या कंपनीच्या बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील कार्यालयातुन दिले जात असुन त्यांचे सुचनेप्रमाणे मुंबईतील अंधेरी, दहिसर तसेच ठाणे, पुणे व कोल्हापुर येथील मॉलमध्ये जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करीत असल्याचे सांगितले. उपस्थित व्यवस्थापक यांना कंपनीच्या क्षेत्रफळाबाबत विचारणा केली असता त्यांनी

CONTROLLER OF RATIONING ... HEAD

0003

कंपनीचे क्षेत्रफळ सुमारे १,८०,००० चौ. फुट असल्याचे सांगितले. याबाबत अधिकाऱ्यांनी एवढया मोठया जागेत साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंच्या साठयाची अल्पवेळात मोजदाद करणे शक्य नसल्याचे सांगुन त्यांना त्वरीत साठवणूकीचे अभिलेख उपलब्ध करुन देण्याच्या सुचना दिल्या. परंतु सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत कंपनीचे व्यवस्थापक यांनी साठवणूकीचे परिपुर्ण अभिलेख सादर केले नाही. अधिकाऱ्यांनी परवान्याबाबत पुन्हा विचारणा केली असता त्यांनी कंपनीच्या कार्यालयात विचारणा केली असुन त्यांचेकडे परवाना असल्याचे सांगितले परंतु ते सादर करु शकले नाहीत. तसेच त्यांचेकडे या विभागाचा परवाना असल्यास त्यांनी नमूद पत्त्यावर परवाना दिलेल्या जिन्नसा व्यतिरिक्त इतर मालाचे उदारहणार्थ साबण, पेस्ट, इत्यादी साठवणूक केल्याचे निदर्शनास आले व त्याबाबतचा संबंधित विभागाचा परवानाही सादर केलेला नाही.

तथापी, दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम १३ अन्वये त्यांना साठापुस्तक ठेवणे आवश्यक असुन तसेच कलम १४ अन्वये त्यांचेकडे आवक झालेल्या साठयाची तसेच विक्री केलेल्या साठयाची व महिनाअखेर शिल्लक साठयाची मासिक विवरणपत्र अनुज्ञाप्ती प्राधिकाऱ्यांकडे नियमीतपणे सादर करणे आवश्यक असुन सुध्दा याबाबतचे कोणतेही अभिलेख त्यांनी तपासणी काळात सादर केले नाही, ही बाब गंभीर आहे.

सदर बाबत पंचनामा करण्यात आला असुन कंपनीचे व्यवस्थापक श्री राजीव शर्मा तसेच त्यांचे सहकारी श्री राजेश राय व सुरक्षा व्यवस्थापक श्री सचीन श्रीकांत पवार यासर्व संबंधितांचा लेखी जबाब पंचांसमक्ष नोंदविण्यात आला.

सबब, उपस्थित व्यवस्थापक श्री राजीव शर्मा यांना जीवनावश्यक वस्तुंच्या साठवणूक, खरेदी व विक्री या करीता आवश्यक असलेला शिधावाटप विभागाचा परवाना व त्या अनुषंगाने आवश्यक असलेले इतर सर्व परिपुर्ण अभिलेख तसेच कंपनीमध्ये जीवनावश्यक वस्तुंच्या साठवणूकीचे तपशिल सादर करण्याकरीता पुरेसा वेळ देवून सुध्दा सादर न केल्याचे तसेच जाणुनबुजुन टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आले आहे.

अशाप्रकारे मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि., आर्कोन वेअर हाऊस ॲन्ड लॉजीस्टीक पार्क, ४७६, गाळा क्र. अे १ ते ४, दिवे गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे यांनी नमुद पत्यावर साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने, तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहुन कंपनीच्या मागिल बाजुस असलेल्या ८ लोखंडी शटर तसेच समोरील बाजुस असलेल्या मुख्य दरवाजावरील लोखंडी शटर क्र १ वगळता उर्वरीत ७ लोखंडी शटर्सना आतील बाजुने कंपनीच्या वतीने कुलुपबंद करण्यात आलेल्या व सदरच्या सर्व कुलपांच्या चाव्या कंपनीच्या ताब्यात असलेल्या अशा सर्व १५ लोखंडी

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

शटर्सना आतील बाजुस असलेल्या कुलुपांस सीलबंद करण्यात आले व गेट क्र १ वरील लोखंडी शटरला बाहेरील बाजुस कुलुपबंद करुन व सदर कुलपाची चावी क्र ७५३८० ताब्यात घेवून पंचांसमक्ष सिलबंद करण्यात आली.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. १४/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि.१४/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. चे संचालक (वित्त व नियोजन) श्री राजेश गर्ग हे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये यापूर्वीच टपालामार्फत सादर केलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ ठाणे यांचेकडून प्राप्त संयुक्त घाऊक परवान्याची छायांकित प्रत सादर केली. तसेच त्यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये त्यांचे नमुद पत्यादरील सिलबंद असलेल्या वेअरहाऊसमध्ये जीवनावश्यक वस्तुंच्या व्यतिरिक्त इतरही विविध प्रकारचे पदार्थांचे साठवणूक केल्याचे सांगुन त्यांचे व्यवसायावर परिणाम होत असल्याने सदरचे वेअरहाऊस सिलमुक्त करण्यास विनंती करुन नमूद केल्याप्रमाणे लेखी खुलासा सादर केला. सबब, पुढील तपासणीच्या अनुषंगाने दि.१८/११/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दि.१८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. या कंपनीच्या वतीने कंपनीचे सेक्रेटरी राकेश कुमार सैनी हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ८ अन्वये कंपनीचे लेखी निवदेन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. यांनी दिनांक ११/११/२०११ रोजी सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद ठिकाणी साठवणूक केलेल्या साठ्याचे सर्व तपशिल SAP या त्यांच्या संगणकीय सॉफ्टवेअरमध्ये असल्याचे नमूद करुन साठवणूक केलेला साठा, प्रारंभिक शिल्लक, खरेदीचे तपशिल व अखेरची शिल्लक याबाबतचे सर्व अभिलेख त्यांच्या संगणकात उपलब्ध असल्याचे सांगून दि.०९/११/२०११ रोजी फिरते पथकाच्या भेटीच्या वेळी

CONTROLLER OF RATIONING

त्यांचे संगणकीय सर्वर डाऊन असल्याने पथकास माहिती सादर करण्यास उशिर झाला. कंपनीच्या वतीने खरेदी केलेल्या साठ्याचे खरेदी बिलाच्या स्थळप्रती व लॉरी रिसिप्ट उपलब्ध असल्याचे सांगितले. तथापी, खरेदी बिलाच्या मुळ प्रती त्यांच्या लेखा शाखेत पुढील पेमेंट प्रक्रियेसाठी पाठवून दिल्याचे सांगून त्यांच्या स्थळप्रती वेअर हाऊसमध्ये उपलब्ध असल्याचे सांगितले तसेच ज्या खरेदी बिलांची एकच प्रत असते अशावेळी सदर बिलांची फोटोकॉपी वेअरहाऊस मधील अभिलेखात ठेवण्यात येते. सदरचेही सर्व अभिलेख त्यांच्या संगणकात इन्वाईस निहाय उपलब्ध असल्याचे सांगितले. जीवनावश्यक वस्तूच्या साठवणूकीसाठी त्यांच्याकडे घाऊक परवाना असल्याचे नमूद करुन त्याच्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत. तसेच सदरचे मुळ परवाने तपासणीचे वेळी उपलब्ध नव्हते याबाबत त्यांनी खंत व्यक्त करुन यापुढे त्यांच्याकडे असलेले मुळ परवाने अथवा त्यांच्या साक्षांकित प्रती तसेच साठवणूक केलेल्या साठ्याचे नमूने त्यांच्या वेअर हाऊसमध्ये उपलब्ध करु देणार असल्याचे सांगितले. मासिक विवरणपत्राबाबत ते यापुढे नियमीतपणे सादर करणार असल्याचे सांगुन त्यांनी त्यांचेकडे असलेला जीवनावश्यक वस्तूंचा साठा परवान्यामध्ये नमूद कमाल मर्यादेपेक्षा कमी असून त्यांचा साठेबाजी किंवा काळाबाजारीचा उद्देश नसल्याचे सांगितले. मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनासोबत दि.०९/११/२०११ अखेर वेअर हाऊसमध्ये शिल्लक असलेले तांदूळ, डाळी/कडधान्य, खाद्यतेल व साखर याबाबतचे शिल्लक साठ्याचे संगणकीय विवरणपत्र सादर केले असून, त्यानुसार त्यांच्याकडे तांदळाचा १४३५.६५ क्विंटल साठा, डाळी/कडधान्याचा ११३१.२१ क्विंटल साठा, खाद्यतेलाचा १,२१,७९४ लिटर्स म्हणजेच ११०८ क्विंटल साठा तसेच साखरेचा ४७०.४१ क्विंटल साठा शिल्लक असल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या वेअर हाऊसमध्ये साठवणूक केलेल्या एकूण साठ्यापैकी २०% साठा जीवनाश्यक वस्तूंचा असून उर्वरित साठ्यापैकी काही साठा हा नाशवंत असल्याचे सांगून त्यांचे सदरचे वेअर हाऊस सिलबंद असल्याने त्यांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याचे सांगून त्यांनी त्यांचे सिलबंद असलेले वेअर हाऊस सिल मुक्त करण्याची विनंती केली आहे.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी दिनांक १८/११/२०११ रोजी सादर केलेल्या तपासणी अहवालात, त्यांचे पथकाने मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलींग प्रा. लि. यांना अन्नधान्य, डाळी /कडधान्य, खादयतेल/वनस्पती यासाठी संयुक्त घाऊक परवाना क्र. ३७फ/भिवंडी/११/ सं.प/९७(घाऊक) तसेच साखर या साठी घाऊक परवाना क्र. ३७फ/भिवंडी/११/साखर/२२(घाऊक) या अनुसुचित वस्तुंकरीता देण्यात आलेले परवानाच्या अनुषंगाने नमुद वेअर हाऊसवर भेट देवून दिनांक १६/११/२०११ रोजी तपासणी घेण्यात आली. तपासणीमध्ये प्रत्यक्ष साठयाची मोजदाद केली असता, तांदुळ - ११३२.८६ क्विंटल, डाळी/कडधान्य - ६८७.३३ क्विंटल, साखर - ५७५.७० क्विंटल तसेच खादयतेलाचा - १६७१०५ लिटर म्हणजेच १५२०.६५ क्विंटल साठा

आढळून आला. सदर तपासणीमध्ये इतर अनुसुचित वस्तु वगळता खादयतेलाचा १२२०.६५ क्विंटल साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळला. तसेच त्यांनी परवानामधील नमुद अटींच्या अनुषंगाने भावफलक/साठाफलक, साठा नोंदवही आणि भेटपुस्तक यांचीही पुर्तता न केल्याचे आढळून आल्याने त्यांनी जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ व दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंन्सिंग ऑर्डर १९९८ तसेच त्या अन्वये देण्यात आलेल्या परवानामधील तरतुदींचा भंग केल्याचे निष्पन्न झाले, असे नमूद केले आहे.

सरपंच, ग्रामपंचायत दिवे (अंजूर), ता. भिवंडी, जि. ठाणे यांचे दिनांक २१/११/२०११ रोजीच्या अहलान्वये, मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि., आर्कोन.वेअर हाऊस ॲन्ड लॉजीस्टीक पार्क, ४७६, गाळा क्र. अे १ ते ४, दिवे गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे भिवंडी निजामपुरा महानगरपालिका च्या हद्दीत येत नसुन त्यांच्या ग्रामपंचायत दिवे(अंजुर) यांचे महसुली हद्दीत येत असल्याचे नमूद केले आहे.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस सादर केलेल्या लेखी निवेदनात त्यांनी विनंतीनुसार वेअरहाऊस सीलमुक्त करुन वेळोवेळी सीलमुक्त करण्यात आलेल्या इतर साठयांबाबत आभार मानुन दिनांक १६/११/२०११ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे पथकाने प्रत्यक्ष मोजदाद केलेल्या अनुसुचीत वस्तुंच्या साठयाबाबत सांगितले की, तांदुळ, डाळी, अन्नधान्य व साखरेचा साठा तपासणीमध्ये सुस्थितीत तसेच कमाल विहीत मर्यादेच्या आत असल्याचे आढळून आले. तथापी, खाद्यतेलाचा साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळला. महाराष्ट्र शासनाचे डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बिया यांच्या साठवणूकीचे सन २००८ च्या आदेशामध्ये खाद्यतेलाची विहीत कमाल मर्यादा ३००० क्विंटल नमुद असल्याने त्यांचेकडून सदरची चुक झाल्याचे सांगितले. तसेच खाद्यतेलाचा अतिरीक्त साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगुन आपल्या कार्यालयाकडून दिनांक २३/२/२०१० रोजीचे साठवणूकीचे कमाल मर्यादेचे सुधारीत आदेश प्राप्त झाल्यानुसार त्यांना अवगत झाल्याचे सांगुन सदरचा साठा त्यांनी काळाबाजारीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगितले. दिनांक १९/११/२०११ रोजीच्या सुनावणीच्या नोटीसामध्ये १२२०.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा अतिरीक्त आढळल्याचे नमुद केल्याचे सांगुन याबाबत काही चुक झाल्याचे सांगुन त्यांचे वेअरहाऊस महानगरपालिकेच्या हद्दीत असल्याचे सांगितले. अतिरीक्त आढळलेल्या खाद्यतेलाच्या साठयाबाबत त्यांचेकडून जाणूनबुजुन चुक झालेली नसुन त्यांनी खाद्यतेलाचा साठा यापुढील काळात विहीत कमाल मर्यादेपेक्षा कमी साठवणूक करुन सदर साठयाचे त्यांचे वेअरहाऊसमध्ये आवक बंद केल्याचे सांगुन सदरची चुकीची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे सांगितले.

CONTROLLER OF RATIONING ... HEA...

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ९/११/२०११ रोजी मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि., आर्कोन वेअर हाऊस ॲन्ड लॉजीस्टीक पार्क, ४७६, गाळा क्र. अे १ ते ४, दिवे गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांचे पथक व पंचांसमवेत भेट दिली असता, नमूद ठिकाणी उपस्थित असलेले कंपनीचे व्यवस्थापक श्री. राजीव शर्मा यांना पथकाने स्वत:ची ओळख करुन देवून भेटीचे प्रयोजन सांगुन त्यांच्या समवेत कंपनीत साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंची तपासणी केली असता मोठया व उंच लोखंडी रॅकवर जीवनावश्यक वस्तु म्हणजेच तांदुळ, विविध प्रकारचे कडधान्य, खादयतेल, साखर व इतर गृहउपयोगी वस्तुंची मोठया प्रमाणावर साठवणूक केल्याचे दिसुन आले. कंपनीचे व्यवस्थापकास साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंच्या खरेदी, विक्री व साठवणूकीसाठी आवश्यक असलेल्या शिधावाटप विभागाच्या परवान्याबाबत विचारले असता त्यांनी त्याच्या कंपनीच्या बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील कार्यालयात विचारणा करुन सांगतो असे सांगितले.

कंपनीमध्ये साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंचे तपशिल सादर करण्यास सांगितले असता त्यांचेकडे याबाबतच्या नोंदवहया नसल्याचे सांगुन सदरची सर्व माहिती संगणकात असुन सद्यस्थितीत संगणकाचे सर्वर डाऊन असल्याने, माहिती सादर करण्यास उशिर होईल असे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्यांचे समवेत असलेल्या पथकास जीवनावश्यक वस्तुंच्या मोजदाद करण्यासाठी कंपनीतील कर्मचाऱ्यांची मदत घेऊन साठ्या मोजदाद करण्यास सुरुवात केली. कंपनीमध्ये साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंची खरेदी बिलांबाबत विचारणा केली असता त्यांनी ट्रान्सपोर्टरच्या बिल्टी व इन्वॉईस सादर करुन त्यांच्या कंपनीत फक्त साठवणूकीचे काम होत असुन सदर साठयाची खरेदी व विक्री बाबतच्या सर्व सुचना त्यांच्या कंपनीच्या बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील कार्यालयातुन दिले जात असुन त्यांचे सुचनेप्रमाणे मुंबईतील अंधेरी, दहिसर तसेच ठाणे, पुणे व कोल्हापुर येथील मॉलमध्ये जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करीत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी एवढया मोठया जागेत साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंच्या साठयाची अल्पवेळात मोजदाद करणे शक्य नसल्याचे सांगुन त्यांना त्वरीत साठवणूकीचे अभिलेख उपलब्ध करुन देण्याच्या सुचना दिल्या. परंतु सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत कंपनीचे व्यवस्थापक यांनी साठवणूकीचे परिपुर्ण अभिलेख सादर केले नाही. अधिकाऱ्यांनी परवान्याबाबत पुन्हा विचारणा केली असता त्यांनी कंपनीच्या कार्यालयात विचारणा केली असुन त्यांचेकडे परवाना असल्याचे सांगितले परंतु ते सादर करु शकले नाहीत. तसेच त्यांचेकडे या विभागाचा परवाना असल्यास त्यांनी नमूद पत्त्यावर परवाना दिलेल्या जिन्नसा व्यतिरिक्त

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE

इतर मालाचे उदारहणार्थ साबण, पेस्ट, इत्यादी साठवणूक केल्याचे निदर्शनास आले व त्याबाबतचा संबंधित विभागाचा परवानाही सादर केलेला नाही.

सबब, उपस्थित व्यवस्थापक श्री राजीव शर्मा यांना जीवनावश्यक वस्तुंच्या साठवणूक, खरेदी व विक्री या करीता आवश्यक असलेला शिधावाटप विभागाचा परवाना व त्या अनुषंगाने आवश्यक असलेले इतर सर्व परिपुंर्ण अभिलेख तसेच कंपनीमध्ये जीवनावश्यक वस्तुंच्या साठवणूकीचे तपशिल सादर करण्याकरीता पुरेसा वेळ देवून सुध्दा सादर न केल्याचे तसेच जाणुनबुजुन टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्याने नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने, तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहुन कंपनीस पंचासमक्ष सिलबंद केले.

दि. १४/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. चे संचालक (वित्त व नियोजन) श्री राजेश गर्ग यांनी उपस्थित राहुन युक्तिवाद केला की, त्यांचेकडे उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ ठाणे यांचेकडून प्राप्त संयुक्त घाऊक परवाना असुन त्यांनी नमुद पत्यावरील सिलबंद असलेल्या वेअरहाऊसमध्ये जीवनावश्यक वस्तुंच्या व्यतिरिक्त इतरही विविध प्रकारचे पदार्थांचे साठवणूक केल्याचे सांगुन त्यांचे व्यवसायांवर परिणाम होत असल्याचे सांगुन सदरचे वेअरहाऊस सिलमुक्त करण्यास विनंती केल्याप्रमाणे या कार्यालयाच्या दिनांक १४/११/२०११ रोजीच्या आदेशान्वये सदरचे वेअरहाऊस सिलमुक्त करुन वेअरहाऊसमधील साठवणूक केलेल्या साठयापैकी जीवनावश्यक वस्तुंच्या साठयाव्यतिरिक्त इतर साठा मुक्त करण्यात येवून जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा पुढील आदेशापर्यंत तपासणीचे अधिन राहुन जैसे थे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याचे आदेश देवून वेअर हाऊस सिलमुक्त करण्यात आले.

तद्नंतर उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे पथकामार्फत मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलींग प्रा. लि. यांना अन्नधान्य, डाळी /कडधान्य, खादयतेल/वनस्पती यासाठी संयुक्त घाऊक परवाना क्र. ३७फ/भिवंडी/११/ सं.प/९७(घाऊक) तसेच साखर या साठी घाऊक परवाना क्र. ३७फ/भिवंडी/११/साखर/२२(घाऊक) या अनुसुचित वस्तुंकरीता देण्यात आलेले परवानाच्या अनुषंगाने नमुद वेअर हाऊसवर भेट देवून दिनांक १६/११/२०११ रोजी तपासणी घेण्यात आली. तपासणीमध्ये प्रत्यक्ष साठयाची मोजदाद केली असता, तांदुळ - ११३२.८६ क्विंटल, डाळी/कडधान्य - ६८७.३३ क्विंटल, साखर - ५७५.७० क्विंटल तसेच खादयतेलाचा - १६७१०५ लिटर म्हणजेच १५२०.६५ क्विंटल साठा आढळून आला. सदर तपासणीमध्ये इतर अनुसुचित वस्तु वगळता खादयतेलाचा १२२०.६५ क्विंटल साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळला. तसेच त्यांनी परवानामधील नमुद अटींच्या अनुषंगाने भावफलक/साठाफलक, साठा नोंदवही आणि भेटपुस्तक यांचीही पुर्तता न केल्याचे आढळून

CONTROLLER OF RATIONING HEAD

आल्याने त्यांनी जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ व दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंन्सिंग ऑर्डर १९९८ तसेच त्या अन्वये देण्यात आलेल्या परवानामधील तरतुदींचा भंग केल्याचे निष्पन्न झाले.

मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलींग प्रा. लि. यांनी केलेल्या विनंतीनुसार या कार्यालयाच्या दिनांक १८/११/२०११ रोजीच्या आदेशान्वये नमुद पत्यावरील वेअरहाऊस मधील तांदुळ, डाळी/कडधान्य व साखरेचा साठा हा तपासणीमध्ये विहीत कमाल मर्यादेच्या आत असल्याने सदरचा अनुसुचित वस्तुंचा साठा सिलमुक्त करण्यात आला. तथापी, "महाराष्ट्र डाळी, खादयतेल बिया आणि खादयतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१०" अन्वये महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर ठिकाणी खाद्यतेलाच्या साठवणूकीकरीता घाऊक परवानाधारकास विहीत कमाल मर्यादा ३०० क्विंटल असुन तपासणीमध्ये आढळलेला १५२०.६५ क्विंटल खादयतेलाचा साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा १२२०.६५ क्विंटल साठा अतिरीक्त आढळल्याने सदरचा अतिरीक्त आढळलेला साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसेथे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याचे आदेश देवून अतिरीक्त आढळलेला खाद्यतेलाचा साठा कंपनीच्या सुपूर्द करण्यात आला.

मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि., आर्कोन वेअर हाऊस ॲन्ड लॉजीस्टीक पार्क, ४७६, गाळा क्र. अे १ ते ४, दिवे गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे हा विभाग महानगरपालिका क्षेत्रात येतो किंवा कसे ? याची अधिक खातरजमा करण्याकरीता ग्रामपंचायत दिवे (अंजूर), ता. भिवंडी, जि. ठाणे यांचे कार्यालयात विचारणा केली असता, त्यांनी या कार्यालयास सादर केलेले त्यांचे दिनांक २१/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि., आर्कोन वेअर हाऊस ॲन्ड लॉजीस्टीक पार्क, ४७६, गाळा क्र. अे १ ते ४, दिवे गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे भिवंडी निजामपुरा महानगरपालिकाच्या हद्दीत येत नसुन त्यांच्या ग्रामपंचायत दिवे(अंजुर) यांचे महसुली हद्दीत येत असल्याचे नमुद केले आहे.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित कंपनीचे सेक्रेटरी राकेश कुमार सैनी यांनी युक्तिवाद केला की, खाद्यतेलाचा साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळला. महाराष्ट्र शासनाचे डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बिया यांच्या साठवणूकीचे सन २००८ च्या आदेशामध्ये खाद्यतेलाची विहीत कमाल मर्यादा ३००० क्विंटल नमुद असल्याने त्यांचेकडून सदरची चुक झाल्याचे सांगितले तसेच खाद्यतेलाचा अतिरीक्त साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगितले, दिनांक १९/११/२०११ रोजीच्या सुनावणीच्या नोटीसामध्ये १२२०.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा अतिरीक्त आढळल्याचे नमुद केल्याचे सांगुन याबाबत काही चुक झाल्याचे सांगुन त्यांचे वेअरहाऊस महानगरपालिकेच्या हद्दीत असल्याचे सांगितले. अतिरीक्त आढळलेल्या खाद्यतेलाच्या साठयाबाबत त्यांचेकडून जाणूनबुजुन चुक झालेली नसुन त्यांनी खाद्यतेलाचा साठा यापुढील काळात विहीत कमाल मर्यादेपेक्षा कमी साठवणूक करुन सदर साठयाचे त्यांचे वेअरहाऊसमध्ये आवक बंद केल्याचे सांगुन सदरची चुकीची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे सांगितले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

तथापी, तपासणीच्या वेळेस पथकास जीवनावश्यक वस्तुंच्या खरेदी, विक्री व साठवणूक संबंधिचे सर्व दस्ताऐवज व अभिलेख सादर करणे आवश्यक असतांना त्यांनी तपासणीच्या वेळेस तसेच सुनावणीच्या वेळेसही साठवणुक संबंधीचे साठा पुस्तक, भेटवही, मासिक विवरणपत्राच्या स्थळप्रती इत्यादी अभिलेख सादर केले नाही, ही बाब गंभीर आहे.

दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायन्सींग ऑर्डर, १९९८ अन्वये देण्यात आलेल्या घाऊक अनुज्ञाप्तीमध्ये अट क्र. ३ नुसार परवानाधारकास साठा पुस्तक अद्यावत ठेवणे आवश्यक असून त्यामध्ये त्या दिवसाचे प्रारंभिक शिल्लक, दिवस भरातील आवक, विक्री व दिवस अखेर प्रत्यक्ष शिल्लक त्याच दिवशी दर्शविणे आवश्यक असून साठा पुस्तकात प्रत्येक अनुसुचित वस्तूचे स्वतंत्र तपशिल दर्शविणे आवश्यक आहे. तसेच परवानाधारकाने मासिक विवरण पत्र प्रत्येक पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे. अनुज्ञाप्तीमधील अट क्र. ४ नुसार परवानाधारकाने शासनाकडून विशेष सुट मिळाल्याखेरीज त्यांनी अनुज्ञाप्तीप्राधीकाऱ्यास प्रपत्र ड मध्ये अनुसुचित वस्तू निहाय आवक, वितरण इत्यादी बाबतचे मासिक विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अनुज्ञाप्तीमधील अट क्र. ५ नुसार परवानाधारकाने त्यांना प्राधिकृत करण्यात आलेल्या परवानामधील नमूद जीवनावश्यक वस्तूंचे विक्री व साठवणूकीबाबत त्यांना देण्यात आलेला परवान्यामधील अटींचे व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे तसेच पर्यायाने त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग करु नये. अनुज्ञाप्तीमधील अट क्र.६ नुसार परवानाधारकाने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा स्थानिक बाजारपेठेत सुरळित न राहण्याच्या दृष्टीने अनुसुचित वस्तूंचे खरेदी, विक्री व साठवणूकीच्या व्यवहारामध्ये सहभागी होऊ नये. अनुज्ञाप्तीमधील अट क्र. ७ नुसार परवानाधारकाने नमूद व्यवसायाच्या पत्त्यावर दर्शनी भागात साठा फलक व भाव फलक लावणे आवश्यक आहे. अनुज्ञाप्तीमधील अट क्र. ८ नुसार परवानाधारकास त्यांनी विक्री केलेल्या अनुसुचित वस्तुंच्या विक्री पावत्यांसह संपूर्ण तपशिल संबंधितांस देणे आवश्यक असून सदर पावत्यांच्या स्थळप्रती तपासणीच्या वेळेस तपासणी अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे. अनुज्ञाप्तीमधील अट क्र. ९ नुसार परवानाधारकाने तपासणी करण्याकरिता आलेल्या पथकास साठा पुस्तक व त्या नुसार असलेला प्रत्यक्ष साठा याबाबतच्या परिक्षणास योग्य ते सहकार्य करणे आवश्यक आहे. अनुज्ञाप्तीमधील अट क्र. १० नुसार परवानाधारकाने तपासणी पथकास साठा पुस्तक, मासिक विवरणपत्र, खरेदी बिले व विक्री केलेल्या मालाचे पावती पुस्तकाच्या स्थळप्रती सादर करणे आवश्यक आहे. तसेच अनुज्ञाप्तीमधील अट क्र. १३ नुसार परवानाधारकाने उपरोक्त नमुद अटी / शर्तीचे उल्लंघन केल्यास तो कायदेशिर कारवाईस पात्र ठरतो.

सबब, मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. यांच्या तपासणीमध्ये इतर अनुसुचित वस्तु वगळता खाद्यतेलाचा १२२०.६५ क्विंटल साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळला. तसेच त्यांनी परवानामधील नमुद अटींच्या अनुषंगाने भावफलक/साठाफलक, साठा नोंदवही आणि भेटपुस्तक यांचीही पुर्तता न

CONTROLLER OF RATIONING HEAD

केल्याचे आढळून आल्याने तसेच अनुज्ञाप्ती प्राधिकारी यांना मासिक विवरणपत्रही सादर न केल्याने त्यांनी दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंन्सिग ऑर्डर १९९८ च्या खंड ४ (२) अन्वये देण्यात आलेल्या परवानामधील अट क्र. ३, ४, ५, ६, ७, ८, व ९ तसेच जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८, व १० चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने, मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. यांचेविरुध्द नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ाा १०१/२०११ दिनांक ०२/१२/२०११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. यांनी त्यांचे वेअरहाऊसमध्ये साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंच्या साठयापैकी खाद्यतेलाचा साठा हा त्यांना दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायन्ससींग ऑर्डर, १९९८ अन्वये देण्यात आलेल्या संयुक्त घाऊक परवाना मधील विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळलेला १२२०.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा नफेखोरीच्या तसेच साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने, खाद्यतेलाचा अतिरीक्त आढळलेला १२२०.६५ क्विंटल साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ाा १०१/२०११ दिनांक ०२/१२/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. यांचे आर्कोन वेअर हाऊस ॲन्ड लॉजीस्टीक पार्क, ४७६, गाळा क्र. अे १ ते ४, दिवे गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे या पत्त्यावरील वेअर हाऊस मधील जप्त करण्यात आलेला १२२०.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. टेस्को हिंदुस्थान होलसेलिंग प्रा. लि. चे मालक,
आर्कोन वेअर हाऊस अॅन्ड लॉजीस्टीक पार्क, ४७६,
गाळा क्र. अे १ ते ४, दिवे गांव भिवंडी,
जिल्हा ठाणे.

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशाप्रमाणे जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे कार्यवाही करण्याकरिता पोलिसांना आवश्यक ती मदत करावी.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शिधावाटप प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.